# अंकीय ग्रंथालय कोरोना काळाची गरज

**प्रा. डॉ. कविता मु. इंगळे** ग्रंथपाल स्व. पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, वरूड

---

**प्रस्तावना :**

आज कोविड-19 चा संप्रेषण प्रादुर्भाव लक्षात घेता आपल्या असे लक्षात येईल की, सुरक्षितता मग ती स्वत:ची, समाजाची पर्यायाने राष्ट्राची, देशाची किती महत्वाची आहे. अशावेळी जगातील कुठलीही माहिति उदाहरण घ्यायचे झाले तर कोविड च्या संसर्गा संबंधीची अद्ययावत माहिती पाहिजे असेल तर ती इंटरनेटद्वारे लगेच कळते. अंकीय ग्रंथालयाद्वारे लॉकडाऊन काळातही विद्यार्थ्यांना विविध स्वरूपातील अद्ययावत माहिती पुरविल्या गेली.

बदल हा निसर्गाचाच नियम आहे. बदल ही भविष्यात चालणारी प्रक्रिया आहे. आज बदल हा समाजातील प्रत्येक घटकांमध्ये घडून आला आहे. याला ग्रंथालये ही अपवाद राहीले नाहीत. प्राचीन काळातील ग्रंथालयाचे स्वरूप हे ग्रंथालयातील ग्रंथ किंवा वाचन साहित्याचे जतन व संरक्षण करणे एवढ्या पुरतेच मर्यादित होते. कारण त्या काळात ग्रंथनिर्मिती करणे फारच अवघड होते.

गुटेनबर्गच्या काळात मुद्रण यंत्रणेचा शोध लागल्यावर ग्रंथ निर्माण करणे सोपे झाले व त्याचाच परिणाम म्हणून ग्रंथनिर्मिती झपाट्याने होऊ लागली. आणि हळूहळू ग्रंथालयाच्या स्वरूपात बदल होऊन ती वाचकाभिमुख झाली.

मुद्रीत साहित्याच्या निर्मितीबरोबरच अमुद्रीत साहित्याचीही निर्मिती मोठ्या प्रमाणात होतांना दिसते. उदा. मायक्रो फॉर्म्स, चुंबकीय साहित्य, ध्वनीमुद्रण, इलेक्ट्रॉनिक मध्यमे इ.

ग्रंथ नियतकालिके हे छापील माध्यमे इलेक्ट्रॉनिक माध्यमा इतकेच आपले अस्तित्व टिकवून ठेवत आहे. त्यामुळेच प्रिंट आणि नॉनप्रिंट स्वरूपातील वाचनसाहित्य ग्रंथालयात संग्रहीत करावे लागले.

**शोध संज्ञा :** अंकीय ग्रंथालय, ई-माध्यमे, इंटरनेट

**अंकीय ग्रंथालय संकल्पना :**

असोसिएशन ऑफ रिसर्च लायब्ररीस (1995) यांनी अंकीय ग्रंथालयाची संकल्पना पुढीलप्रमाणे मांडलीआहे.

1) अंकीय ग्रंथालय ही काही एकच एक वस्तू नाहीत तर त्यास विविध अंगे आहेत.

2) अंकीय ग्रंथालयात विविध माहितीस्त्रोत एकमेकांशी जोडण्यासाठी प्रगत संगणक व दळणवळण माहिती तंत्रज्ञानाची आवश्यकता असते.

3) माहिती स्त्रोत जोडणाऱ्या जोडण्या (लिंक्स) पारदर्शी असतात.

4) अंकीय ग्रंथालये माहीती सेवांचा लाभ सर्वकष स्वरूपात असतो.

अंकीय ग्रंथालय या संकल्पनेमध्ये माहीती ही अंकीय स्वरूपात साठवलेली असते. ती अंकीय माध्यमाद्वारे जाळयामार्फत उपभोगत्यांना वापरता येईल. तसेच अंकीय ग्रंथालयाचा माहिती स्त्रोत एकाच ठिकाणी असण्याची आवश्यकता नाही. अंकीय ग्रंथालय परिपूर्ण स्वयंचलित स्वरूपाचे असून त्यातील संपदाही केवळ अंकीय स्वरूपात आहे. [2]

**व्याख्या : अंकीय ग्रंथालय**

1. बारसिंग यांच्या मते "मल्टिमिडीया अंकीय स्वरूपातील माहितीच्या जगभर वेगाने विस्तारीत असलेल्या जाळयातील माहिती प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शोधण्याची सुविधा पुरविणाऱ्या संरचनेला अंकीय ग्रंथालय म्हणतात."३

2. बॉर्गमन (Borgman) 1996 यांच्या मते, "अंकीय स्वरूपातील माहितीची निर्मिती, त्या माहितीचा शोध व तिचा वापर यासाठी उपलब्ध असलेली इलेक्ट्रॉनिक माहिती साधने आणि संबंधित तांत्रिक क्षमता यांचा एकत्रित संच म्हणजे अंकीय ग्रंथालय होय. कोणत्याही स्वरूपाच्या (अक्षरे, अंक, ध्वनी, चित्र, स्थिर व चलचित्र) अंकीय डेटाच कौशल्याने हाताळणी करू शकणारी ही एक सुधारित विकेंद्रीत स्वरूपाची माहिती संग्रहन व प्रतिप्राप्त पद्धत आहे आणि ही सर्व माहिती विकेंद्रीत स्वरूपाची नेटवर्क मध्ये उपलब्ध असते." [4]

3. आर्म्स डब्ल्यू (1995) यांच्या मते, "अंकीय ग्रंथालयाच्या ठिकाणी साहित्य संग्रह हा अंकीय स्वरूपात साठवलेला असतो व नेटवर्कच्या माध्यमातून तो वापरता येतो असे ग्रंथालय वापरण्यासाठी संग्रह व माहिती सेवांचे व्यवस्थापन केलेले असते. [5]

**अंकीय ग्रंथालयाची गरज :**

कोविड-19 या महामारीच्या काळात राज्यातील संगळीकडे ग्रंथालयांची ऑफलाईन सेवा लॉकडाऊनमुळे बंद करण्यात आली आणि विद्यार्थीनींची परिक्षा त्यांचे वर्ग हे देखील ऑनलाईनच घेण्यात येत आहे. अशा या महामारीच्या काळात ग्रंथालयांनीही ऑफलाईन सेवा न देता ऑनलाईन सेवा देता याव्यात याकरिता मात्र अंकीय ग्रंथालयाची आज गरज आहे. याशिवाय खालील घटकांच्या आधारे अंकीय ग्रंथालयाची गरज अधिक स्पष्ट करता येईल.

1. **माहितीची/ज्ञानाची निर्मिती :** आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. अशा या युगात दररोज प्रत्येक क्षणाला जगामध्ये वेगवेगळ्या विषयांवर प्रचंड वेगाने वाचन साहित्याची, ज्ञानाची निर्मिती होऊ लागली आहे. ही माहिती प्रत्येकाच्याच उपयोगाची असते. परंतु ही सर्वच माहिती कोणत्याही एका ग्रंथालयाला विकत घेणे अशयक आहे. ह्यामुळे ही सर्व माहिती अंकीय स्वरूपात उपलब्ध झाल्यास सर्व ग्रंथालयांना माहितीचे, ज्ञानाचे आदान-प्रदान करणे सोपे जाते.

2. **अंकीय स्वरूपात माहितीची उपलब्धता :** ज्ञानाच्या युगात माहिती निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर संगणकाचा वापर करण्यात येत आहे. प्रत्येकच लहान मोठ्या कार्यालयात दैनंदिन कामकाजासाठी संगणक वापरले जात आहे. अशी ही माहिती हार्डडिक्स, फ्लॉपी, टेप, सी.डी. इत्यादी माध्यमामध्ये साठवून ठेवण्यात येत आहे. आज इनसायक्लोपिडिया सारख्या अधिक किंमतीच्या ग्रंथ व नियतकालीकासोबत त्यांच्या सि.डी. पण वितरीत केल्या जाते. अशा स्वरूपातील माहिती ही एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी काही क्षणातच पाठविण्यात येते. आज प्रत्येक संशोधकाला आपले संशोधन हे देखील अंकीय स्वरूपात तयार करावे लागते. त्यामुळेच अंकीय ग्रंथालयाची गरज निर्माण झाली आहे.

3. **वित्तीय तरतुदींचा अभाव :** आज ग्रंथालयांच्या बाबतीत प्रत्येक महाविद्यालयाचा, संस्थाचालकांचा दृष्टीकोन बदलत आहे. ग्रंथालयावर आवश्यक तेवढा खर्च केला जात नाही. परंतु दुसरीकडे मात्र ग्रंथ आणि नियतकालिकांच्या किंमतीमध्ये प्रचंड वाढ होत चालली आहे. त्यामुळेच आहे त्या आर्थिक तरतुदीमध्ये व नव-नविन सेवा देण्यासाठी आज अंकीय ग्रंथालयाची गरज आहे.

4. **व्यवस्थापन विषयक समस्या व इतर प्रश्न :** ग्रंथालय व्यवस्थापन करीत असतांना आज मोठ्या प्रमाणात होणारी माहिती निर्मितीची अडचण निर्माण होत आहे. यामध्ये महत्वाची अडचण जागेची असून त्यानंतर त्यासाठी लागणारा तज्ञ कर्मचारी हा अपूरा पडु लागला. त्याचबरोबर ग्रंथ व ग्रंथेत्तर वाचन साहित्याचे जतन व संरक्षण या काही महत्वाच्या समस्याही ग्रंथालय व्यवस्थापनामध्ये निर्माण झाल्या आहेत. त्या समस्या कमी करण्यासाठी ग्रंथालयात अंकीय स्वरूपातील वाचन साहित्य घेणे आवश्यक आहे.

5. **छापील माध्यमांची मर्यादा :** कागदाचे आयुष्य कमी असल्यामुळे त्यावरील छापील मजकुर खराब होतो. तो टिकवून ठेवणे व त्याचे संरक्षण करण्यासाठी त्यावर उपाय म्हणून मुद्रीत माहिती ही मायक्रोफिल्मी, फोटोकॉफी, सी.डी अशा तंत्रज्ञानावर आधारीत साधनावर परावर्तीत करून ठेवणे आवश्यक आहे. परंतु यावरही मर्यादा असल्यामुळे अशा साहित्याचे कायम स्वरूपी अंकीय करण करून आवश्यकतेनुसार वा गरजेनुसार वाचकांना उपलब्ध करून देण्यासाठी अंकीय ग्रंथालयाची गरज आहे.

6. **विविध भाषेतील माहिती वापरण्याची एकत्र सोय :** भारतामध्ये विविध भाषा बोलण्यात येते त्यामुळे साहित्याची निर्मिती ही विविध भाषेमध्ये होते. अशा या विविध भाषेतील साहित्याचा एकत्र अभ्यास होणे. वाचकांच्या दृष्टीने सोयीचे असते. आज ज्ञानेश्वरी, भगवतगीता सी.डी. च्या स्वरूपात उपलब्ध झाल्याने ऑनलाईनच्या माध्यमातून एकाच ठिकाणी बसून पाहता येतात. हे केवळ अंकीय ग्रंथालयामुळे शक्य असल्याने त्याची आवश्यकता आहे.

**7. इंटरनेट माध्यमातील प्रसारीत माहिती वापरण्यातील तांत्रिक अडचणी :** इंटरनेट माध्यमातील प्रस्थापित माहिती इंटरनेटद्वारे संकेतस्थळाच्या माध्यमातून माहिती शोधण्यात अडचणी येवू लागल्या आहेत. त्यापैकी 'सर्वर बिझी' ही अडचण असून अशाच प्रकारे 'डॉस हल्ला' ही आणखी एक अडचण आहे. डिनायल ऑफ सर्व्हिस हल्ला म्हणजे इंटरनेट वरील एखाद्या संकेतस्थावर केलेले अपायकारक हल्ला होय. ज्यामुळे कायदेशीर असलेले उपयोजक त्या संकेतस्थाशी संपर्क साधू शकत नाही व ते त्यासंबंधीत सेवा पासून वंचीत ठेवले जाते. त्याबरोबरच इंटनेटच्या माध्यमातून विविध प्रकारची अंकीय स्वरूपाची माहिती उदा. ई-बुक्स, ई-डाटाबाबत, ई-जर्नल्स इ. व्यापारी तत्वावर उपलब्ध होते. ती माहिती वापरण्यासाठी त्यावर अटी व मर्यादा घातल्या जातात. त्यामुळेच आज अंकीय ग्रंथालयाची गरज निर्माण झाली आहे.

**8. माहिती डाऊनलोड करण्यासाठी :** इंटनेटवरील माहिती ही काही ठराविक काळासाठीच उपलब्ध करून दिलेली असते. त्यामुळे अशी माहिती पुढील काळात आवश्यकता वाटल्यास पाहता येत नाही. अशा वेळी ती माहिती जर आपण आपल्या ग्रंथालयामध्ये डाऊनलोड केली तर ती कधीही पाहता येते. त्यासाठी अंकीय तंत्रज्ञान उपलब्ध पाहिजे.

**9. ऑनलाईन स्टडी करण्यासाठी :** कोरोना काळात लॉकडाऊनमुळे जे विद्यार्थी घरी आहेत त्यांच्याकरीता अंकीय ग्रंथालयामुळे ऑनलाईन स्टडी करणे फारच सोईचे होते. जगातील प्रत्येक विषयाची प्रकाशित पूर्ण माहिती ही कोणत्याही एका ग्रंथालयाला संग्रहीत करणे शक्य नाही अशावेळी इतर ग्रंथालयाचा आधार घ्यावाच लागतो. उपयुक्त माहिती ज्या इतर ग्रंथालयात उपलब्ध आहे. तेथील माहिती आपण आपल्या ग्रंथालयात बसून ऑनलाईन उपलब्ध करू शकतो. यासाठीच अंकीय तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे.

**निष्कर्ष :**

कोरोनासारख्या महामारीच्या काळात अंकीय ग्रंथालय असणे ही आज खरोखरच काळाची गरज आहे. कारण अंकीय ग्रंथालयामुळे जागतीक पातळीवरील माहितीची उपलब्धता होते. अंकीय ग्रंथालयाद्वारे दिली जाणारी सेवा व माहिती ही माहिती तंत्रज्ञानामुळे थेट वाचकांपर्यंत पोहोचते. अंकीय ग्रंथालयातील सेवा या अद्ययावत अधिक सुस्पष्ट व प्रभावी असतात. अंकीय ग्रंथालयातील वाचन साहित्य अस्थायी असू शकते ते केव्हाही नष्ट होऊ शकते. त्यामुळे आज पाहिलेली माहिती उद्या मिळेलच याची शाश्वती नाही.

**संदर्भ सूची :**

1. फडके, द.ना. ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण. पुणे युनिव्हर्सल प्रकाशन, 2007, पृ. 303
2. देवधर, विजय, "अंकीय ग्रंथालय सेवा : लेखा परिक्षण आणि नियंत्रण" ज्ञानगंगोत्री, जून/ऑगष्ट 2006' पृ. 4
3. पानगे, बी.एम. "डिजीटल ग्रंथालय" ज्ञानगंगोत्री जून/ ऑगस्ट 2002' पृ. 34-36 पवार, परितोष द इंगटरनेटवर द्वेषाने केलेला हल्ला : अर्थात निनापल ऑफ सर्व्हिस अटॅक" ज्ञानगंगोत्री मार्च/मे 2006